| | |
|---|---|
| खटला दाखल तारीख - | ०६/१०/२०१८ |
| खटला नोंदणी तारीख - | १७/१०/२०१८ |
| खटला निकाल तारीख - | १६/०३/२०२६ |
| **कालावधीः** | **०७ वर्ष ०४ महिने ३० दिवस** |

**भाग-'अ'**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.३), दौंड, जिल्हा - पुणे.**
**(पिठासीन अधिकारी- जी. एस. बडगुजर)**

**(न्यायनिर्णय दिनांक :- १६ मार्च, २०२५)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७८०/२०१८**

**निशाणी क्र.३७**

**(यवत पो.स्टे.अपराध क्र.६८८/२०१८)**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | : | महाराष्ट्र शासन तर्फे-<br>ठाणे अंमलदार, यवत पोलीस ठाणे, ता. दौंड, जि. पुणे. |
| अभियोग पक्षातर्फे | : | विद्वान विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती सी.एस.भोसले |
| | | **-: विरुध्द :-** |
| आरोपी | : | प्रशांत रामदास गायकवाड, वय– २८ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>रा. बोरीएंदी, ता. दौंड, जि. पुणे. |
| बचाव पक्षातर्फे | : | विद्वान विधीज्ञ श्री.ए.पी.फडके. |

**दोषारोप- भारतीय दंड संहिता, १८६० कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४, ३९/१९२ अन्वये.....**

**भाग-'ब'**

| अ.क्र. | विवरण | दिनांक |
|---|---|---|
| ०१ | गुन्हा घडल्याचा दिनांक | २५/०७/२०१८ |
| ०२ | प्रथम खबर अहवाल दिनांक | २५/०७/२०१८ |
| ०३ | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | १७/१०/२०१८ |

| | | |
|---|---|---|
| ०४ | दोषारोप निश्चिती दिनांक | ०६/०१/२०२२ |
| ०५ | पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | २६/०९/२०२५ |
| ०६ | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | -- |
| ०७ | न्यायनिर्णयाचा दिनांक | १६/०३/२०२६ |
| ०८ | निकाल सुनावनीचा दिनांक | १६/०३/२०२६ |

## आरोपीचा तपशिल

| श्रेणी | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष/ दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौ.प्र.सं. कलम ४२८ करिता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्रशांत रामदास गायकवाड | समजपत्र | १४/१२/ २०१८ | भा.दं.सं. कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४, ३९/१९२ | निर्दोष | निर्दोष | — |

## भाग-क

**अ.अभियोग पक्ष :-**

| अ.क्र. | साक्षीदारांची नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| ०१ | कुमार दशरथ नरूटे | २८ | फिर्यादी |

**ब.बचाव पक्षाचे व न्यायालयीन साक्षीदार जर असतील तर :- निरंक**
**क.न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी :- निरंक**
**ड.अभियोग पक्ष :- निरंक**
**इ.भौतीक वस्तु :- निरंक**

## -: न्या य नि र्ण य :-

(घोषित तारीखः १६ मार्च, २०२६)

१. प्रस्तुत खटल्यात आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४, ३९/१९२

अन्वये शिक्षेसपात्र अपराधाच्या दोषारोपासाठी संपरीक्षा घेण्यात आली.

**<u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत की:-</u>**

२. दि.२५/०७/२०१८ रोजी पहाटे ०३.०० वाजण्याचे सुमारास मौजे सहजपुर, ता. दौंड, जि. पुणे गावचे हद्दीत शिवा कन्स्ट्रक्शनचे जवळ आरोपीने त्याच्या ताब्यातील ब्रिझा कारची रितसर नोंदणी न करता कारला एम.एच.-४२-ए.एस.-७७१६ अशी नंबर प्लेट लावून ती हयगईने, अविचाराने व रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगात सोलापूर बाजूकडून पुणे बाजुकडे चालवित घेऊन जात असतांना त्याचे समोर पुणे बाजूस जात असलेल्या ४०७ टेम्पो क्र.एम.एच.-०४-सी.यु.-३३२४ ला ओव्हरटेक करित असतांना टेम्पोला उजवे बाजूस धडक बसून अपघात करून टेम्पोमधील फिर्यादी व इतर व्यक्तिंच्या किरकोळ दुखापतीस कारणीभूत होऊन दोन्ही वाहनांचे नुकसानीस कारणीभूत झाला. त्यामुळे फिर्यादीने (सा.क्र.१) आरोपीविरुध्द यवत पोलीस स्टेशनला जबानी रिपोर्ट नोंदविला.

३. उपरोक्त आशयाच्या फिर्यादी जबानी रिपोर्टावरुन यवत पोलीस ठाण्यात आरोपीविरुध्द गुन्हा रजिस्टर क्र.६८८/२०१८ भारतीय दंड संहिता, १८६० कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४, ३९/१९२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास यवत पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक / ब.क्र.५१४ श्री.एस.ए.दडस यांच्याकडे सोपविण्यात आल्याने त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळी जाऊन दिसते परिस्थितीचा पंचनामा केला. तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा गोळा झाल्याने त्यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर माझ्या पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरूद्ध भारतीय दंड संहिता, १८६० कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४, ३९/१९२ अन्वये शिक्षेसपात्र अपराधाचा दोषारोप (नि.क्र.११) ठेऊन तो आरोपीला त्याच्या बोलीभाषेत वाचून व समजावून सांगितला असता आरोपीने त्याच्या निवेदनात गुन्हा कबूल नसल्याचे कथन करून खटल्याची संपरीक्षा घेण्याची विनंती केली.

५. तद्नंतर अभियोग पक्षातर्फे फिर्यादी (सा.क्र.१) कुमार दशरथ नरूटे यांचा नि.क्र.२८ वर तोंडी पुरावा नोंदविण्यात आला. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या खटल्याला समर्थन केलेले नाही. तो पूर्णतः फितूर झाला. तद्नंतर वेळोवेळी इतर साक्षीदार व तपास अधिकारी यांना साक्षी समन्स व जमानती वॉरन्ट बजावणी होऊनही अभियोग पक्ष पुढील साक्षीदारांना न्यायालयासमक्ष हजर ठेवण्यात अपयशी ठरला आहे. नि.क्र.३४ वरील पोलीस रिपोर्टनुसार दि.३१/१०/२०२५ रोजी तपास अधिकारी हे मयत झाले आहेत. त्यामुळे बचाव पक्षाच्या विद्वान वकिलांच्या व विद्वान विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या युक्तिवादावरून व उपरोक्त परिस्थिती तसेच खटल्याचे वयोमान विचारात घेऊन अभियोग पक्षाचा पुरावा नि.क्र.१ वर आदेश पारित करून बंद करण्यात आला. आरोपीविरूद्ध गुन्हादर्शक पुरावा मिळून आलेला नसल्याने त्यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यापासून सूट देण्यात आली.

६. अभियोग पक्षातर्फे विद्वान विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती. सी.एस.भोसले व बचाव पक्षातर्फे विद्वान विधीज्ञ श्री.ए.पी.फडके यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे व पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले. खालील मुद्दे खटल्याच्या न्यायनिर्णयासाठी उपस्थित झाले. त्यावर मी कारणांसह पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविला आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष शाबित करतो काय की, दि.२५/०७/२०१८ रोजी पहाटे ०३.०० वाजण्याच्या सुमारास मौजे सहजपूर, ता. दौंड, जि. पुणे गावच्या हद्दीत शिवा कन्स्ट्रक्शनचे जवळ सोलापूर–पुणे हायवे रोडवर आरोपीने त्याच्या ताब्यातील ब्रिझा कारची रितसर नोंदणी न करता एम.एच.–४२–ए.एस.–७७१६ अशी नंबर प्लेट लावून ती हयगईने, अविचाराने, रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगात सोलापूर बाजुकडून पुणे बाजुकडे चालवित घेऊन जात असतांना त्याचेसमोर पुणे बाजूस जात असलेल्या ४०७ टेम्पो क्र.एम.एच.–०४–सी.यु.–३३२४ ला ओव्हरटेक करित असतांना टेम्पोला उजवे बाजूस धडक बसून अपघात करून अपघातात टेम्पोमधील फिर्यादी व इतर लोकांच्या | ....नाही. |

| | | |
|---|---|---|
| | किरकोळ दुखापतीस तसेच दोन्ही वाहनांचे नुकसानीस कारणीभूत झाला आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता, १८६० कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटर वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४ व ३९/१९२ अन्वये शिक्षेसपात्र अपराध केला अन्वये शिक्षेसपात्र अपराध केला ? | |
| २. | अंतीम आदेश काय ? | ...अंतीम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

७. प्रस्तृत खटल्यात – आरोपीने त्याच्या ताब्यातील ब्रिझा कारची रितसर नोंदणी न करता एम.एच.-४२-ए.एस.-७७१६ अशी नंबर प्लेट लावून ती हयगईने, अविचाराने, रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगात सोलापूर बाजुकडून पुणे बाजुकडे चालवित घेऊन जात असतांना त्याचेसमोर पुणे बाजूस जात असलेल्या ४०७ टेम्पो क्र.एम.एच.-०४-सी.यु.-३३२४ ला ओव्हरटेक करित असतांना टेम्पोला उजवे बाजूस धडक बसून अपघात करून अपघातात टेम्पोमधील फिर्यादी व इतर लोकांच्या किरकोळ दुखापतीस तसेच दोन्ही वाहनांचे नुकसानीस कारणीभूत झाल्याचे तथ्य वाजवी संशयापलिकडे जाऊन निर्विवादपणे सिध्द करण्याची जबाबदारी अभियोग पक्षाच्या खांद्यावर आहे. त्यानुषंगाने अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे बारकाइने अवलोकन करणे आवश्यक आहे.

८. अभियोग पक्षाने फिर्यादी म्हणून सा.क्र.१- कुमार दशरथ नरूटे (नि.क्र.२८) यांची साक्ष नोंदविली आहे.

**<u>मुद्दा क्र.१ करिताः-</u>**

९. फिर्यादी (सा.क्र.१) यांनी त्यांच्या तोंडी पुराव्यात असे आले आहे की, त्यांना घटनेची तारीख व वर्ष आठवत नाही, घटना अंदाजे ५ ते ७ वर्षापूर्वी घडली, घटना यवतला झाली होती, घटना पहाटे ०३.०० वाजता झाली होती, ते पंढरपूरहून ठाण्याला ४०७ टॅम्पो या वाहनाने चालले होते, त्यांच्या टॅम्पोचा क्र.एम.एच.-०४-सी.यु.-३३२४ होता, त्यांच्या

गाडीमध्ये ४ ते ५ महिला व ११ पुरूष होते, पंढरपूरहून ठाण्याला जात असतांना त्यांच्या गाडीला मागून येणाऱ्या फॉरच्युनर गाडीने धडक दिली, त्यांना त्या गाडीचा क्रमांक सांगता येणार नाही, धडक दिल्याने त्यांची गाडी पलटी झाली होती त्यामुळे माणसांना थोडे लागले होते, कोणाला डोक्यात तर कोणाला पायाला लागले होते, त्यानंतर त्यांनी जखमींना हॉस्पीटलला पोहचविले, तेथे त्यांच्यावर उपचार झाले, त्यानंतर ते घरी गेले, त्यानंतर त्यांनी फिर्याद नोंदविली.

१०. फिर्यादी (सा.क्र.१) यांनी फिर्यादी जबाबातील मजकूराबाबत त्यांना माहिती नसल्याचे कथन केले आहे. त्यांनी पोलीसांना फिर्याद देतांना मागून धडकणारी ब्रेझा क्र.एम.एच.-४२-ए.एस.७७१६ व त्यावेळी चालकाचे नाव प्रशांत रामदास गायकवाड यांचे नाव सांगितले असल्याचे तथ्य नाकारले आहे. तसेच ते आरोपीला ओळखू शकणार नसल्याचे कथन करून अभियोग पक्षाच्या खटल्याला समर्थन केले नाही. फिर्यादी (सा.क्र.१) अभियोग पक्षाला पूर्णतः फितूर झाला आहे. त्यामुळे विद्वान विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा कसून उलटतपास घेतला. मात्र अभियोग पक्षाला गुन्हा सिध्दतेसाठी उपयुक्त ठरेल असा सबळ पुरावा पटलावर आला नाही.

११. पटलावरील उपरोक्त तोंडी पुराव्याचे व कागदोपत्री पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता फिर्यादीने अभियोग पक्षाच्या खटल्याला समर्थन केलेले नाही. अशा परिस्थितीत आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेल्या उपरोक्त दोषारोपातील एकही आवश्यक घटक वाजवी संशयापलिकडे जाऊन निर्विवादपणे सिध्द होण्याइतपत सबळ व भक्कम पुरावा पटलावर आलेला नाही. फिर्यादी फितूर झाल्याने घटनेची फिर्याद देखील सिध्द झालेली नाही. पटलावर आरोपीविरूद्ध कुठलाही सबळ पुरावा आलेला नाही. घटनेच्या वेळी व दिवशी आरोपीच अपघातग्रस्थ वाहन चालवित असल्याचे तथ्य अभियोग पक्षाने वाजवी संशयापलिकडे जाऊन सिद्ध केलेले नाही. त्यामुळे अभियोग पक्षाच्या खटल्याबद्दल संशय उत्पन्न होतो व पटलावर आरोपीविरुध्द कुठलाही सबळ पुरावा नसल्याने सदर संशयाचा फायदा आरोपीस देणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोदविला असून मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल पुढीलप्रमाणे आदेश पारित केला आहे :

## -: आ दे श :-

१. आरोपी- प्रशांत रामदास गायकवाड यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २५५ (१) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४, ३९/१९२ अन्वये शिक्षेसपात्र अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे पुर्वीचे जामिनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. अभियोग पक्षाने प्रस्तुत निकालाविरुध्द, मा. वरिष्ठ न्यायालयात दाद मागितल्यास, आरोपी हे नोटीस मिळताच स्वतःहून हजर राहतील याचे खात्रीसाठी, आरोपी यांनी आजपासून सहा महिनेचे कालावधी करिता, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) (१) अन्वये पुर्तता करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by BADGUJAR GAJANAN SHIVDAS
Date: 2026.03.16 17:38:12 +0530

(जी.एस. बडगुजर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.३), दौंड.

दिनांक : १६/०३/२०२६.

## CERTIFICATE

**I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.**

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Shri. S. B. Khule (L.G.) |
| Name of Court | 3rd Jt. CJJD & JMFC, Daund, Dist. Pune. |
| Date of Dictation | 16/03/2026. |
| Judgment/Order signed by the PO on | 16/03/2026. |
| Judgment /Order uploaded on | 16/03/2026. |